**मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.३१२३/२०२० वर दि.०९/०९/२०२० रोजी एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या आदेशास अनुसरून सन २०१९ मधील पोलीस भरती संदर्भातील करावयाची कार्यवाही.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- पोलीस १८१८/प्र.क्र.३६३/पोल-५अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक - ०४ जानेवारी, २०२१

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाची आणि राज्यातील नियंत्रणा खालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने दि. २७/०६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात सिव्हिल अपील क्र.३१२३/२०२० व इतर याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सदरील याचिकांवर मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०९/०९/२०२० रोजीच्या आदेशान्वये अंतरीम स्थगिती दिलेली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास दिलेल्या उपरोक्त अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून सन २०१९ या वर्षामध्ये पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे सूचना देत आहे.

**शासन निर्णय :-**

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०९/०९/२०२० रोजी सिव्हिल अपील क्र.३१२३/२०२० व इतर याचिका यामध्ये दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून सन २०१९ या वर्षातील पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एसईबीसी प्रवर्गाकरीता आरक्षण न ठेवता भरती प्रक्रिया पार पाडावी यासाठी संबंधीत जाहिरातीमध्ये शुध्दीपत्रकाव्दारे आवश्यक ती सुधारणा करण्यात यावी. तदनंतर सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची पात्रता ठरविताना खुल्या प्रवर्गाची वयोमर्यादा लागू करून, जे उमेदवार खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करत आहेत अशा उमेदवारांचे अर्ज खुल्या प्रवर्गातून विचारात घेण्यात यावेत.

तसेच अशी कार्यवाही करताना ज्या उमेदवारांनी एसईबीसी प्रवर्गासाठी विहीत केलेले परीक्षा शुल्क भरले आहे, त्या उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या परीक्षा शुल्काची रक्कम अदा करण्यासाठी, आवश्यक फरकाची रक्कम / फी शुल्क भरण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी देण्यात यावा. तसेच सदरहू वाढीव परीक्षा शुल्क कशापध्दतीने भरण्यात यावे याबाबतचा तपशिल

Scanned with CamS
Scanned by CamScanner

संबंधित घटक प्रमुखांकडून प्रसिध्द करण्यात येणाऱ्या पोलीस शिपाई भरती जाहिरातीच्या शुध्दीपत्रकात करण्यात यावा.

२. वरील सूचना या मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली सिव्हिल अपील क्र.३१२३/२०२० व इतर याचिकांमधील निर्णयाच्या तसेच राज्य शासनाने या कामी देण्यात आलेली अंतरीम स्थगिती उठविण्याकरीता दाखल केलेल्या अर्जाच्या निर्णयाच्या अधीन राहतील.

३. हा शासन निर्णय सर्वोच्च न्यायालयातील सिव्हिल अपील क्र.३१२३/२०२० व इतर याचिकांमधील अंतिम/ अंतरिम निर्णयाच्या व / किंवा अंतरिम स्थगिती उठविण्याच्या अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत लागू राहील.

४. वरील निर्णयाची अंमलबजावणी पोलीस महासंचालक यांनी तात्काळ करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनाकडे सादर करावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१०१०५११०९२५२८२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shirish Nagorao
Mohod

Digitally signed by Shirish Nagorao Mohod
[illegible]

(शिरीष मोहोड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा .मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. सर्व सन्माननिय विधानसभा /विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२ ,नागपूर.
१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३.प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४ प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.



Scanned by CamScanner

१५.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई.
१९.मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२०.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२१.सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२२.सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२३.सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई औरंगाबाद, नागपूर,
२४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६.विधिमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई १०)प्रती,(
२७. सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२८. निवड नस्ती/कार्यासन १६-अ.



Scanned by CamScanner